# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

## मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजी संपन्न ५७ व्या बैठकीतील ठराव क्र. ५७(२)/२०२१ चे सहपत्र

**अ. मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचे लाभ, योजनांचे अटी शर्ती, सद्यस्थिती, नवीन योजना राबविणेबाबत मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णयाबाबतचा तपशील**

### शैक्षणिक सहाय्य योजना- ०७

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| १. | किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती - इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु.२५००/- आणि इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी शैक्षणिक सहाय्य | रु. २५००/-<br>रु. ५०००/- | १. ७५% हजेरीबाबत शाळेचा दाखला/ हजेरीपत्रक<br>२. शाळेमध्ये शिक्षण घेत असल्याचा पुरावा बोनाफाईड दाखला (मूळ प्रत)<br>३. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे. | बदल नाही. |
| २. | इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५०% किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास शैक्षणिक सहाय्य | रु. १०,०००/- | १. इयत्ता १० वी व १२ वी मध्ये किमान ५०% किंवा अधिक गुण प्राप्त झाल्याची गुणपत्रिका<br>२. शाळेमध्ये शिक्षण घेत असल्याचा पुरावा/ बोनाफाईड दाखला (मूळ प्रत)<br>३. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | लाभ वाटपातील द्विरुक्ती टाळण्याकरीता सदर योजना बंद करण्यात यावी. |
| ३. | इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी शैक्षणिक | रु. १०,०००/- | १. १० वी व ११ वी ची गुणपत्रिका<br>२. शाळेमध्ये शिक्षण घेत असल्याचा पुरावा/ बोनाफाईड दाखला (मूळ प्रत) | इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रति शैक्षणिक वर्ष रू.१५,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्यात यावे. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| | सहाय्य | | ३. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | |
| ४. | पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी शैक्षणिक सहाय्य | रु २०,०००/- | १. मागील शैक्षणिक इयत्ता उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रिका/ प्रमाणपत्र<br>२. शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या पावत्या व पुस्तके व शैक्षणिक सामुग्री खरेदीच्या पावत्या सोबत जोडणे.<br>३. कॉलेजचा बोनाफाईड दाखला (मूळ प्रत)<br>४. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी अन्य पदवीप्रमाणे सनदी लेखापाल या पदवीकरीताही प्रतिवर्षी रू.२०,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्यात यावा. |
| ५. | वैद्यकीय पदवीकरीता<br>व अभियंत्रिकी पदवीकरीता शैक्षणिक सहाय्य | रू.१,००,०००/-<br>रू.६०,०००/- | १. मागील शैक्षणिक वर्ष उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक/ प्रमाणपत्र<br>२. चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्याबाबतची पावती/ बोनाफाईड दाखला<br>३. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | बदल नाही. |
| ६. | शासनमान्य पदविकेमध्ये प्रती शैक्षणिक वर्षी आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये प्रति शैक्षणिक वर्षी शैक्षणिक सहाय्य | रू.२०,०००/-<br>रु. २५,०००/- | १. मागील शैक्षणिक इयत्ता उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक/ प्रमाणपत्र<br>२. चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्याबाबतची पावती/ बोनाफाईड दाखला<br>३. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | शासनमान्य पदव्युत्तर पदवीके प्रमाणे एमबीए या पदविकेकरीताही प्रति शैक्षणिक वर्षी रू.२५,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्यात यावे. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| ७. | संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती. तथापि, MS-CIT उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास सदर शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात यावी. | शुल्काप्रमाणे | १. MS-CIT कोर्स प्रमाणपत्र व शुल्काची पावती<br>२. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | बदल नाही. |

## सामाजिक सुरक्षा व अन्य योजना-०८

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| १. | पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी अर्थसहाय्य | रु. ३०,०००/- | १. विवाह नोंदणी प्रमाणपत्र<br>२. प्रथम विवाह असल्याबाबत शपथपत्र<br>३. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | बदल नाही. |
| २. | प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना | | १. आधार कार्ड<br>२. बँक पासबुक (राष्ट्रीयीकृत बँक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बँक)<br>३. भ्रमणध्वनी (OTP करीत स्वत:चा अथवा कुटूंबातील अन्य व्यक्तीचा) | बदल नाही. |
| ३. | प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना | रू. २.०० लक्ष | योजनेचे सदस्य झाल्याचा पुरावा | मंडळामार्फत बांधकाम कामगारांच्या नैसर्गिक मृत्यू प्रकरणी बांधकाम कामगाराच्या वारसास देय रक्कम रू.२.०० लक्ष चा लाभ सर्व नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना वय वर्षे १८ ते ६० करीता लागू करण्यात आल्यामुळे सदर योजना बंद करण्यात यावी. |
| ४. | प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना | रू. २.०० लक्ष | योजनेचे सदस्य झाल्याचा पुरावा | सदर योजनेत नोंदीत बांधकाम कामगाराने भरावयाच्या वर्गणीची रक्कम थेट मंडळमार्फत भरता येईल काय याबाबत एलआयसी च्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून प्रस्ताव मंडळाच्या विचारविनिमयाकरीता आगामी बैठकीत सादर करण्यात यावा. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| ५. | सुरक्षा संच वाटप करणे - प्राटेक्टीव शूज, हेअरिंग प्रोटेक्शन, सेप्टी हेल्मेट, सेप्टी हार्नेस, मास्क, सेप्टी हँड ग्लोव्हज, रिफलेक्टीव जॅकेट | सुरक्षा संच | मंडळाचे ओळखपत्र | बदल नाही |
| ६. | अत्यावश्यक संच वाटप करणे -<br>सोलर टॉर्च मॉस्कीटो नेट, प्लॅस्टीक मॅट, टिफीन बॉक्स, आऊटर बॅग, वॉटर बॉटल, गॅल्वनाईज ट्रंक | अत्यावश्यक संच | मंडळाचे ओळखपत्र | बदल नाही. |
| ७. | पूर्व शिक्षण ओळख (RPL) प्रशिक्षण योजना | ८ ट्रेड चे प्रशिक्षण | मंडळाचे ओळखपत्र | बदल नाही. |
| ८. | नोंदीत बांधकाम कामगारासाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणे. | मध्यान्ह भोजन | १. मंडळाचे ओळखपत्र<br>२. वितरण कार्ड | बदल नाही. |

## आरोग्य विषयक योजना-०६

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| १. | महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना/ आयुष्यमान भारत योजना | लाभार्थी कुटुंबास **९७१** उपचाराकरीता प्रति कुटुंब प्रति वर्ष **१.५०** लक्ष व मुत्रपिंड प्रत्यारोपनाकरीता रू. **२.५** लक्षापर्यंत विमा संरक्षण | मंडळाचे ओळखपत्र | सद्यस्थितीत मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता राज्याची महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना राबविण्यात येते. |
| २. | गंभीर आजाराच्या उपचारार्थ अर्थसहाय्य | रु. १,००,०००/- | १. सक्षम वैद्यकीय अधिका-याने दिलेले प्रमाणपत्र<br>२. संपूर्ण वैद्यकीय उपचाराच्या कागदपत्रांच्या सत्य प्रती<br>३. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | बदल नाही. |
| ३. | ७५% किंवा कायमचे अपंगत्व आल्यास अर्थसहाय्य | रू. २,००,०००/- | १. कामगारास ७५% किंवा अधिक अपंगत्व असल्याचे सक्षम वैद्यकीय अधिका-याचे/ वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र<br>२. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | मंडळाच्या ५१ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावानुसार ७५% ऐवजी ५०% अंपगत्व आल्यास सक्षम वैद्यकीय अधिकारी/ वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र प्राप्त करून रू.२.०० लक्ष अर्थसहाय्य देण्यात यावे. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| ४. | बांधकाम कामगारांच्या पत्नीस नैसर्गिक प्रसुतीसाठी शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी अर्थसहाय्य | रु.१५,०००/-<br>रु. २०,०००/- | १. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेले नैसर्गिक/ शस्त्रक्रियेद्वारे प्रसूतीचे प्रमाणपत्र<br>२. वैद्यकीय उपचाराची देयके<br>३. प्रसूती घरी झालेली असल्यास ग्रामसेवकाने दिलेले जन्म नोंदणी प्रमाणपत्र<br>४. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | स्त्री बांधकाम कामगार अथवा बांधकाम कामगाराच्या पत्नीच्या नैसर्गिक प्रसूतीसाठी किंवा शस्त्रक्रियेद्वारे प्रसूतीसाठी रू.२०,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्यात येत आहे. |
| ५. | एका मुलीच्या जन्मानंतरकुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत (रू.एक लाख फक्त) मुदत बंद ठेव | रू. १,००,०००/- | १. सक्षम वैद्यकीय अधिका-याने दिलेले कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेबाबतचे प्रमाणपत्र<br>२. अर्जदारास एक कन्या अपत्य असल्याचे शपथपत्र<br>३. मुलीचे आधारकार्ड<br>४. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | मंडळाच्या ५१ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावानुसार सदर योजना बंद करण्यात यावी. |
| ६. | नोंदीत बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करणे. | बांधकामाच्या ठिकाणी शिबीर आयोजन करणे | मंडळाचे ओळखपत्र | बदल नाही. |

## आर्थिक सहाय्य योजना- ०७

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| १. | अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) अर्थसहाय्य | रू.२.०० लक्ष | १. प्रधानमंत्री आवास योजनेत पात्र असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे पत्र/ प्रमाणित प्रत<br>२. बांधकाम कामगारांच्या नावे अथवा पती/ पत्नीच्या नावे स्वत:ची सदनिका नसेल अशा बांधकाम कामगारांचे रू.१००/- च्या मुद्रांकावर लेख प्रमाणक (Notary) करणे.<br>३. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | बदल नाही. |
| २. | अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अर्थसहाय्य | रू.२.०० लक्ष | १. प्रधानमंत्री आवास योजनेत पात्र असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे पत्र/ प्रमाणित प्रत<br>२. बांधकाम कामगार यांच्या स्वत:च्या अथवा पती/ पत्नीच्या नावे घर नसल्याचे हमीपत्र<br>३. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | बदल नाही. |
| ३. | गृहकर्जावरील रू.६.०० लक्ष पर्यंतच्या व्याजाची रक्कम अथवा | रू. २.०० लक्ष | १. राष्ट्रीयीकृत बँकेत कर्ज घेतल्याचा पुरावा/ कर्ज विम्याची पावती<br>२. घर पती- पत्नी संयुक्त नावे नोंदणीकृत असल्याचा पुरावा<br>३. राज्यात स्वत:च्या / पत्नीच्या नावे घर | लाभ वाटपातील द्विरुक्ती टाळण्याकरीता सदर योजना बंद करण्यात यावी. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| | | | नसल्याचे हमीपत्र<br>४. राष्ट्रीयीकृत बँकेकडून ०६ लाख रूपयांचे व्याज देय प्रमाणपत्र सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | |
| ४. | कामगाराचा कामावर असताना मृत्यु झाल्यास कायदेशीर वारसास अर्थसहाय्य | रू. ५.०० लक्ष | १. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला मृत्यूचा दाखला<br>२. अर्जदार कायदेशीर वारस असल्याचा पुरावा,<br>३. बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्याबाबतचा पुरावा- पंचनामा व प्राथमिक चौकशी अहवाल (FIR)<br>४. नामनिर्देशित व्यक्ती उपलब्ध नसल्यास उत्तराधिकारी प्रमाणपत्र<br>५. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | बदल नाही. |
| ५. | कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास अर्थसहाय्य<br>**(वय वर्षे ५१ ते ६०)** | रू.२.०० लक्ष | १. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला मृत्यूचा दाखला<br>२. नामनिर्देशित व्यक्ती उपलब्ध नसल्यास उत्तराधिकारी प्रमाणपत्र<br>३. अर्जदाराचे आधारकार्ड व बँकेचा तपशील<br>४. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | मंडळाच्या दि.०३.०६.२०१९ रोजीच्या ५१ व्या बैठकीत पारित ठरावानुसार मंडळाकडे नोंदीत वय वर्षे १८ ते ६० वयोगटातील बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रू.२.०० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात यावे. |
| ६. | कामगाराचा मृत्यू झाल्यास वारसदारास अर्थसहाय्य | रू. १०,०००/- | १. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला मृत्यूचा दाखला<br>२. नामनिर्देशित व्यक्ती उपलब्ध नसल्यास | बदल नाही. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| | | | उत्तराधिकारी प्रमाणपत्र<br>३. अर्जदाराचे आधारकार्ड व बँकेचा तपशील<br>४. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | |
| ७. | कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नीस/पतीस पाच वर्षे अर्थसहाय्य | रू. २४,०००/- | १. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला मृत्यूचा दाखला<br>२. नामनिर्देशित व्यक्ती उपलब्ध नसल्यास उत्तराधिकारी प्रमाणपत्र<br>३. अर्जदाराचे आधारकार्ड व बँकेचा तपशील<br>४. सर्व सत्यप्रतीवर स्वत: साक्षांकित करून सादर करणे | बदल नाही. |

**ब. मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता प्रस्तावित योजनांबाबत मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णयाचा तपशील**

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| १. | नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगाराचा अपघात/ नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याचे शव मूळ गावी पाठविण्यास अर्थसहाय्य | बांधकाम कामगाराने नोंदणी करताना घोषित केलेल्या मूळ प्रति कि.मी. रू.२०/- अथवा एस.टी. महामंडळाच्या आगारप्रमुखाने प्रमाणित केलेल्या अंतरासाठी प्रति कि.मी. रू.२०/- प्रमाणे | १. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला मृत्यूचा दाखला<br>२. नामनिर्देशित व्यक्ती उपलब्ध नसल्यास उत्तराधिकारी प्रमाणपत्र<br>३. अर्जदाराचे आधारकार्ड व बँकेचा तपशील<br>४. सर्व सत्यप्रतीवर वारसदाराची स्वाक्षरी असावी. | नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगाराचा अपघाती/ नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याचे शव नोंदणी करताना घोषित केलेल्या मूळ गावी पाठविण्यासाठी एस.टी. महामंडळाच्या आगारप्रमुखाने प्रमाणित केलेल्या अंतरासाठी प्रति कि.मी. रू.२०/- प्रमाणे शव वाहतूकीची रक्कम आगाऊ स्वरूपात त्यांच्या वारसास देण्यात यावी. |
| २. | नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचा अपघात होऊन हात किंवा पाय निकामी झाल्यास कृत्रिम हात किंवा पाय बसविण्यासाठी अर्थसहाय्य देणे. | प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे | १. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी हात अथवा पाय निकामी झाल्याचे प्रमाणित करणे.<br>२. कृत्रिम हात किंवा पाय बसविणेबाबत सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे शिफारस पत्र<br>३. Artificial Limb Manufacuring Corporation of India कडून कृत्रिम हात किंवा पाय बसविल्याचे प्रमाणपत्र | नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचा अपघात होऊन हात किंवा पाय निकामी झाल्यास बांधकाम कामगाराने कृत्रीम हात/ पाय Artificial Limb Manufacuring Corporation of India, Kanpur (Regional office Navi Mumbai) या संस्थेकडून बसवावा. त्यासाठीचा खर्च Artificial Limb Manufacuring Corporation of India, Kanpur या संस्थेने प्रमाणित केल्याप्रमाणे अदा करण्यात यावा. |

**क. इमारत व इतर बांधकामावर काम करणाऱ्या कामगारांच्या नोंदणीकरीता बांधकामाच्या ठिकाणी ९० दिवस काम केल्याबाबत स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र (Self certificate) ग्राहय धरणेबाबत मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय**

| अ. क्र. | अधिनियमातील अट | सद्यस्थितीत ९० दिवसाचे प्रमाणपत्र देणाऱ्या व्यक्ती/ संस्था | निर्देश/ मागणी | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| १. | इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या मंडळाकडील नोंदणीकरीता मागील वर्षभरामध्ये ९० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस बांधकामाच्या ठिकाणी काम केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. | १. इमारत व इतर बांधकाम करणारे नियोक्ता/ कंत्राटदार<br>२. महानगरपालिका/ नगरपालिका/ नरपरिषदांनी प्राधिकृत केलेले अधिकारी<br>३. ग्रामसेवक<br>(उद्योग, उर्जा व कामगार विभागाची अधिसूचना दि.१३.०८.२०१४, नविवि चे २७.०६.२०१७ व ग्राविवि चे परिपत्रक दि.२२.०९.२०१७) | १. मा. सर्वोच्च् न्यायालयात सादर रिट याचिका क्र.३१८/२००६ संदर्भात पारित आदेशानुसार केंद्र शासनाकडून मॉडेल वेलफेअर स्किम सोबत निर्गमित मार्गदर्शक सूचनेनुसार ९० दिवसाचे प्रमाणपत्र देण्यासाठी कामगार संघटनांना प्राधिकृत करणे, बांधकाम कामगारांचे स्वयं साक्षांकित पत्र (Self Certificate) देणेबाबत मंडळ स्तरावर निर्णय घ्यावा असे निर्देश आहे.<br>२. केंद्र शासनाच्या दि.०६.०७.२०२० रोजी Mission Mode Project अंतर्गत निर्गमित निर्देशामध्ये सुध्दा बांधकाम कामगारांने ९० दिवस बांधकामाच्या ठिकाणी काम केल्याचे स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र (Self Certificate) घेणेबाबत निर्देश आहेत. | देशातील अन्य राज्यांमध्ये बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता बांधकाम कामगारांकडून ९० दिवस काम केल्याचे स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र (Self certificate) घेऊन नोंदणी करण्यात येत असल्यास त्याबाबतचे अध्यादेश/आदेश/ परिपत्रक स्वयं साक्षांकित प्रमाणपत्राचा नमुना व सदर प्रमाणपत्र घेण्याबाबतच्या कार्यपध्दतीची माहिती प्राप्त करावी व त्यानुसार प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीत विचारविनिमयाकरीता सादर करण्यात यावा. |

| अ. क्र. | अधिनियमातील अट | सद्यस्थितीत ९० दिवसाचे प्रमाणपत्र देणाऱ्या व्यक्ती/ संस्था | निर्देश/ मागणी | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| | | | ३. निवारा बांधकाम कामगार संघटना, सांगली व इतर अन्य संघटनांनी मा. उच्च् न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ९३५२७/२०२० मध्ये मॉडेल वेलफेअर स्किम बाबत देण्यात आलेल्या निर्देशानुसार बांधकाम कामगारांने ९० दिवस बांधकामाच्या ठिकाणी काम केल्याचे स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र (Self Certificate) घेणेबाबत मागणी केलेली आहे. | |